Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ३५] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १७-२३, २०१९/आश्विन २५-कार्तिक १, शके १९४१ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा., अ. क्र. १९८.

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचावे :** (१) श्री. डि. बी. राठोड, विशेष लेखापरिक्षक श्रेणी-२, अंतर्गत जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, भंडारा यांचे पत्र जा.क्र. ३४-विलेप वर्ग-२-दोष दुरुस्ती शेरे-सन २०१९, दि. २९ जुलै २०१९.

(२) श्री. डि. बी. राठोड, विशेष लेखापरिक्षक श्रेणी-२, अंतर्गत जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, भंडारा यांचे पत्र जा.क्र. विलेप वर्ग-२-अंके-कृउबास ले.प.अहवाल-१४-सन २०१९, दि. ३० मार्च २०१९.

(३) महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५ (१).

(४) महाराष्ट्र शासन सहकारी व कृषि विभागाचे अधिसूचना क्र. एपीएम २०८१-३६३४०-४४०-११-स, दि. ०५ सप्टेंबर १९८१.

(५) या कार्यालयाचे आदेश जा. क्र. २०३३-२०१९, दि. ०६ मे २०१९.

(६) या कार्यालयाचे निर्देश जा. क्र. २७६०-२०१९, दि. २१ जून २०१९.

(७) या कार्यालयाचे पत्र जा. क्र. २५४६-२०१९, दि. १० जून २०१९.

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५ (१) अंतर्गत कारणे दाखवा नोटीस

क्रमांक जिउनि-भं-कृउबास-ला-कलम ४५(१)-कारणे दाखवा नोटीस-४३९७-२०१९.—

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर, जि. भंडारा या बाजार समितीची स्थापना व रचना महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्या अंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतुदीनुसार झाली आहे. (ज्याचा यापुढे उल्लेख केवळ 'पणन कायदा व नियम' असा केलेला आहे.) त्यामुळे सदरहू बाजार समिती व तिच्या विद्यमान संचालक मंडळाला उपरोक्त नमूद पणन कायद्यातील व त्या अंतर्गतच्या नियमातील तरतुदीनुसार तसेच सदरहू बाजार समितीच्या उपविधीमधील तरतुदीनुसार शासनाचे व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, म.रा., पुणे यांचे परिपत्रकाद्वारे दिलेले निर्देश तथा सूचना यांना अनुसरुन कृषि उत्पन्न बाजार समितीचे कामकाज चालविणे आवश्यक आहे, आणि ;

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर, जि. भंडारा या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिनांक ०३ मार्च २०१७ पासून पदभार स्विकारलेला आहे. त्यामुळे सदरहू विद्यमान संचालक मंडळाला सदरहू बाजार समितीचे कामकाज महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्या अंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतुदी, शासनाचे व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परीपत्रकीय निर्देश तथा सूचना तसेच बाजार समितीच्या पोट-नियमानुसार चालविणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर, जि. भंडारा या बाजार समितीचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण विशेष लेखापरीक्षक श्रेणी-२, अंतर्गत जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, भंडारा यांनी केलेले असून, वाचावे क्र. (१) अन्वये या कार्यालयास लेखापरीक्षण अहवाल सादर केलेला आहे, सदरहू बाजार समितीच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील भाग “ अ ” मध्ये नमूद गंभीर दोषाची पूर्तता करण्याकरीता, दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे आवश्यक असते, त्यानुसार वाचावे क्र. (२) नुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर, जि. भंडारा या बाजार समितीचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा दोष दुरूस्ती अहवाल “ ओ ” नमुन्यात सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्र. (२) नुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर, जि. भंडारा या बाजार समितीचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या “ ओ ” नमुन्यात सादर केलेल्या दोष दुरूस्ती अहवालाचे अवलोकन केले असता, वैधानिक लेखापरीक्षण अहवालातील भाग “ अ ” मध्ये नमूद गंभीर दोषांची पूर्तता करतांना कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीने दिलेले उत्तर समाधानकारक नसल्यामुळे, आक्षेप कायम असल्याचे लेखापरीक्षकाने नमूद केले आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीच्या प्रभारी सचिव व विद्यमान संचालक मंडळाने खालील नमूद मुद्याबाबत महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतुदी, शासनाचे व मा. पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परीपत्रकीय निर्देश तथा सूचना, तसेच बाजार समितीच्या पोट-नियमाचे पालन केले नसल्याचे, तसेच सोपविलेली जबाबदारी व कर्तव्य पार पाडण्यात कसूर केल्याचे खालील मुद्यावरून दिसून येते.

(१) भेटी व समारंभ खर्चापोटी रक्कम रु. ६०,३०० खर्च करण्यात आला असून, सदर खर्चाचे बिल बाजार समितीमध्ये नसून, व्हाऊचरवर खर्च अदा करण्यात आलेला आहे. सदर खर्च कोणासाठी खर्च करण्यात आलेला आहे, याबाबत तपशीलवार माहिती बाजार समितीच्या व्हाऊचरवर नाहीत. असे लेखपरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

(२) बाजार समितीच्या उपविधीनुसार बाजार समितीच्या कोणत्याही अधिका-याला भाड्याने गाडी वापरण्याचा अधिकार नाही. तरी सुद्धा गाडी भाडे बिलाशिवाय समितीच्या व्हाऊचरवर नावे दर्शवून गाडी भाड्यापोटी रक्कम रु. २,३३,४०० इतका खर्च केल्याचे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

(३) जाहिरात खर्चाबाबत पुण्य नगरी या वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली असतांना, बिल मात्र अंबिका प्रिंटर्स ॲन्ड पब्लीकेशनचे रक्कम रु. १०,००० चे लावलेले आहे. सदर जाहिरातीचे बिल हे दि. १२ जून २०१७ रोजी बेरर चेक क्र. ६९६३६६, जि.म.स. बँकेचा असून, सदरहू व्यवहारात बाजार समितीच्या संचालक मंडळाने हेतुपुरस्सर खोटे बिल जोडल्याचे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(४) बाजार समितीने गणेश ट्रेडींग कंपनी यांचेकडून रक्कम रु. २२,००० चे फिटींग सामान खरेदी केल्याचे नमूद आहे. परंतु कोणते सामान खरेदी केले आहे व बाजार समितीमधील कोणत्या कामासाठी खरेदी केले आहे, हे नमूद नसल्याचे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विकी (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(५) बाजार समितीमध्ये किरकोळ दुरूस्तीचे साहित्य खरेदी केले असून, त्याचे रक्कम रु. ९१,६०० बिल दप्तरी ठेवलेले नाही व त्यास बाजार समिती नोंदणी अधिका-याची मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही. असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरुस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विकी (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(६) विद्युत खर्चाचे बिल रक्कम रु. ७२,७९० व्हाऊचरवर अदा केलेले आहे. परंतु सदर खर्चाचे प्रिंटेड बिल नसल्याचे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(७) वृक्षारोपनासाठी बाजार समितीच्या आवारात श्री. प्रकाश येरणे यांना रु. ५,००० चे खड्डे खोदण्याची मंजूरी दिलेली आहे. सदर बिल समितीने व्हाऊचरवर अदा केलेले आहे. परंतु किती झाडे ? काय दराने ? खरेदी केले याचे पक्के बिल नाही, असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(८) बाजार समितीने वकील फी साठी रक्कम रु. ६५,००० अदा केलेले असून, वकील नियुक्तीचा ठराव व पक्के बिल आढळून येत नाही. असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(९) बाजार समितीच्या मुख्य यार्डमधील साफसफाई खर्च व उप-बाजार मासळ मधील साफसफाई खर्च रक्कम रु. ५३,००० करण्यात आलेला असून, किती तास रोटावेटरने साफसफाई करण्यात आली व त्याचे दर किती आहेत ? हे नमूद केले नसून, खर्चाचे ट्रक्टर मालकाचे बिलसुद्धा घेण्यात आलेले नाही, असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

(१०) गजघाटे इंडस्ट्रीज, मासळ यांनी दिलेल्या बिलावर पांढरी शाई लावून, कमी रक्कमेचे बिल मिटविण्यात आले असून, रक्कम रु. १०,००० बाजार समितीने गजघाटे इंडस्ट्रीज, मासळ यांना अदा केलेली आहे. सदरहू बिलावर सभापतीची सही आहे. परंतू सदरची रक्कम ही बोर्ड पेंटीगची असताना, रोकड वहीला मात्र बोर्ड तयार करण्याचा खर्च नमूद आहे. असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(११) बाजार समितीने कलम १२ (१) ची मान्यता न घेता किरकोळ दुरूस्ती करीता सुपरव्हीजन म्हणून आर्किटेक्ट फी रक्कम रु. २२,०००, दि. ३१ जानेवारी २०१८ ला श्री. विलासजी वासेकर, लाखांदूर व दि. ३० जून २०१७ ला रक्कम रु. ३,००० श्री. लोकेश राहुल यांना अदा केलेली आहे. वरील दोन्ही आर्किटेक्ट यांची नियुक्ती केलेली नसून, त्यांना कामाचे आदेश सुद्धा देण्यात आलेले नाही, तसेच श्री. वासेकर यांना रक्कम रु. २२,००० मिळाल्याबाबत व्हाऊचरवर त्यांची सही सुद्धा नाहीत. असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(१२) पक्के बिल नसतांना बेसीन बसवण्याचा खर्च, देणगी खर्च, विद्युत खर्च, जाहिरात खर्च, टॉयलेट खर्च, फ्रिज खर्च, गॅस खर्च, साफसफाई खर्च, स्टेशनरी खर्च, भेटी व समारंभ खर्च, देखभाल दुरूस्ती खर्च इत्यादीवर रक्कम रु. १,२२,३९१ खर्च केले व सदर खर्च समितीने व्हाऊचरवर अदा केलेले आहेत. असे लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षकाने नमूद करून, दोष दुरूस्ती अहवालामध्ये सुद्धा सदरहू मुद्यासंबंधाने आक्षेप कायम असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यामान संचालक मंडळाने बाजार निधीचा दुरूपयोग जाणूनबुजून केल्याचे दिसून येत असल्याने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतुपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास दिसून येते.

(१३) बाजार समितीमधील एकूण १६ अनुज्ञाप्तीधारक व्यापारी यांचेकडून रक्कम रु. १०,४१,६९५ बाजार फी व सुपरव्हीजन फी घेणे बाकी असून, सदर व्यापारी, अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांचेकडून सदर फी ची रक्कम वेळीच वसूल करणे आवश्यक असताना, समिती पदाधिकारी यांनी आजतागायत संबंधितांकडून बाजार फी व देखरेख फी ची रक्कम वसूल केलेली नाही वा वसुलीकरीता प्रस्ताव या कार्यालयास पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी सादर केलेला नाही. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाला महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३४(अ)(२) अन्वये सोपविलेल्या कर्तव्यात व जबाबदारीमध्ये कसूर केल्याचे दिसून येते.

(१४) बाजार समितीने किरकोळ दुरूस्तीकरीता रक्कम रुपये ३,५२,३२३ खर्च केलेली असून, सदर खर्चामध्ये मार्केट यार्डमध्ये फ्लोअरींग व हॉलची दुरूस्ती याबाबत खर्चाचा समावेश असून, समिती पदाधिका-यांची मंजूरी नसताना, खर्चाचे इस्टिमेट/आराखडा काढलेला नसताना, आर्किटेक्टची नियुक्ती नसताना, रक्कम नगदीने अदा केलेली असून, बेरर चेक ने व्यवहार केलेले आहेत, तसेच बांधकाम करणेबाबत कंप्लीशन सर्टिफिकेट सुद्धा नाही. तसेच सदरहू बांधकामास बाजार समितीने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १२(१) अन्वये सहकार खात्याची किंवा शासनाची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १२(१) चे कर्तव्यपालन व जबाबदारीमध्ये हेतुपुरस्सर कसूर केल्याचे दिसून येते.

(१५) बाजार समिती उपविधी क्रमांक १६(३) व (४) नुसार बाजार फी व देखरेखची वसूली करण्याचा अधिकार आहे. तसेच उपविधी क्रमांक १७(१) नुसार बाजार क्षेत्रामध्ये शेतमाल खरेदी करणारे व्यापारी, अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांनी बाजार समितीकडे बाजार फी व देखरेख फी शेतमालाचे वजन किंवा मोजणी झाल्यानंतर ताबडतोब भरण्यास बंधनकारक राहिल व ज्या व्यापारी, अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांनी याबाबत कसूर केल्यास द.सा.द.से. १२% दराने दंडासहीत बाजार फी वसूल करण्याचा अधिकार बाजार समितीला आहे. परंतू, बाजार समितीने बाजार फी व देखरेख फी व्यापारी, अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांचेकडून वेळीच वसूल करून, बाजार समितीच्या बँक खात्यात भरली नाही. त्यामुळे सदर बाजार फी व देखरेख फी १ किंवा २ महिन्यात किंबहूना त्याहीपेक्षा जास्त महिन्यात बाजार समितीला दिली तर काही व्यापारी, अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांनी बाजार समितीला आजपर्यंत सदर फी दिलेली नाही. बाजार समिती पदाधिकारी यांनी या बाबीकडे दुर्लक्ष करून, उक्त उपविधीतील तरतूदीचे पालन करण्यास कसूर केल्याचे निदर्शनास येत आहे.

(१६) बाजार समिती उपविधी क्रमांक १५ नुसार कोणत्याही इसमास वैध अनुज्ञप्ती असल्याशिवाय समितीच्या बाजार क्षेत्रात खरेदी-विक्री करण्यास मनाई असून, उपविधी क्रमांक ६० नुसार अनधिकृत व्यापार करण्यास प्रतिबंध आहे. तसेच उपविधी क्रमांक १०(४) नुसार या कारणाकरीता समितीचे सभापती, सचिव किंवा बाजार समितीने नियुक्त केलेल्या इसमास उपविधी क्रमांक १३ नुसार अशा व्यवहारांची तपासणी करणे आवश्यक असते. परंतु, अशी तपासणी बाजार समितीच्या निरीक्षकांकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे बाजार समिती उपविधी क्रमांक १३ चे उल्लंघन झालेले दिसून येत आहे.

(१७) बाजार समितीने एकूण १० हंगामी कर्मचारी नियुक्त केलेले असून, त्यांना किमान वेतन (मिनिमन वेजेस) कायद्याप्रमाणे वेतन देण्यात येत आहे. परंतू, सदरहू १० हंगामी कर्मचारी नियुक्तीस नोंदणी अधिका-याची मंजूरी घेणे बंधनकारक असताना, तशी मंजूरी बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने १० हंगामी कर्मचारी बाजार समितीमध्ये नियुक्त करताना घेतलेली नाही. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परीपत्रक जावक क्रमांक पणन-५-कृउबास-नोकरभरती-१९९१, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ नुसार दिलेल्या शासन आदेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

(१८) बाजार समितीचे उपविधी क्रमांक ३५ नुसार व महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १४(१) अन्वये मतदार यादी तयार करण्याच्या आणि निवडणूकीचे कामकाज चालविण्याच्या प्रयोजनासाठी बाजार समितीने या अधिनियमान्वये फी च्या रूपाने मिळालेल्या सर्व रक्कमांच्या ५% किंवा दरसाल रक्कम रुपये १०,००० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढ्या रक्कमेचा निवडणूक निधी स्थापन करेल अशी स्पष्ट तरतूद असताना, समिती पदाधिकारी यांनी निवडणूक निधीसाठी राखीव निधीची तरतूद केलेली नसल्यामुळे, बाजार समिती उपविधी क्रमांक ३५ व कलम १४(१) चे हेतुपुरस्सर उल्लंघन केल्याचे आढळून येते.

(१९) बाजार समितीने दिनांक २९ मे, २०१७ चे मासिक सभेत सन २०१७-१८ या वर्षात शाखानिहाय धान खरेदी केंद्रावर टोकन देण्याकरीता ठराव क्रमांक ३(अ) नुसार ११ कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली. परंतू, सदर नियुक्तीला संचालकाची मान्यता घेण्यात आली नाही. त्यामुळे मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक जावक क्रमांक पणन-५-कृउबास-नोकरभरती-१९९१, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ नुसार दिलेल्या शासन आदेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तसेच सदर ११ कर्मचा-यांना आदेश व मेहनताना ठरविण्यात आला नाही. त्यामुळे बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळाने वेतन देण्याबाबत अधिनियम, १९६३ चे कलम १००(५) चे उल्लंघन केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

(२०) कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीच्या आर्थिक कारभाराविषयी ज्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्यात, त्यावर या कार्यालयाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४०(ब) अन्वये तपासणी करून, अहवालातील नमूद निष्कर्षाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत, कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीच्या संचालक मंडळाला कळवूनही, विद्यमान संचालक मंडळाने कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे निदर्शनास येत नाही. त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ या कार्यालयाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास कसूर करीत असून, बाजार समितीची रक्कम वसूल करण्यास उदासीन असल्याचे दिसून येत आहे.

(२१) कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सादर केला असता, सदरहू लेखापरीक्षण अहवालातील भाग "अ" मधील नमूद गंभीर दोषांची पूर्तता करून, दोष दुरूस्ती अहवाल सादर करण्याच्या अनुषंगाने व बाजार समितीच्या प्रशासकीय कारभाराविषयी ज्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्यात, त्यावर या कार्यालयाने बाजार समितीच्या विद्यमान संचालक

मंडळाची सुनावणी या कार्यालयात दिनांक ४ जून, २०१९ रोजी घेण्यात आली व त्यानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० (ई) अन्वये बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाला निर्देश देण्यात आले. परंतू, सदरहू निर्देशाचे पालन बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने समाधानकारकपणे केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळ निर्देशाचे पालन करण्यास कसूर करीत असल्याचे दिसून येत आहे.

(२२) कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीने महाराष्ट्र राज्य, कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून बाजार समितीच्या विविध कामाकरीता घेतलेले अंशदान व कर्ज रक्कमांचा अद्यापही भरणा केला नसून, तसेच महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी बाजार समितीकडे थकीत कर्ज असलेली रक्कम रुपये ११,४०,६७४ व थकीत असलेली अंशदान रक्कम रुपये १२,६६,०२२ भरणा करणेबाबत वारंवार पत्रव्यवहाराद्वारे व दूरध्वनीद्वारे बाजार समितीला कळविले. तसेच सदरहू रक्कम महाराष्ट्र, राज्य कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तात्काळ भरणा करणेबाबत कळविले असून, कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने अद्यापही सदरहू कर्ज रक्कम रुपये ११,४०,६७४ व अंशदान रक्कम रुपये १२,६६,०२२ चा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे भरणा करणेबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ वरीष्ठ कार्यालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यास कसूर करीत असून, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३२(२) नुसार शासनाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करीत असल्याचे दिसून येते.

(२३) कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीकडे शासनाची सुपरव्हीजन फी रक्कम रुपये ९,९८,४२२ इतकी थकीत असून, सदरहू सुपरव्हीजन फी ची रक्कम ही सन २०१३-१४ पासून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील असून, सदरहू थकीत सुपरव्हीजन फी ची रक्कम शासनास भरणा करण्याबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ जबाबदार असून, सुपरव्हीजन फी च्या माध्यमातून शासनास येणे असलेला महसूल हेतूपुरस्सर/मुद्दामहून थकविण्याबाबत कसूर करीत असल्याचे निदर्शनास येते. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३४(ब)(२) चे उल्लंघन करीत असल्याचे दिसून येते.

(२४) कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीमधील कर्मचारी हे कायमस्वरूपी बाजार समितीचे कामकाज करीत असून, त्यांना त्यांचे दरमहा वेतन वेळेत मिळत नसल्याबाबत व सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या लाभाच्या रक्कम मिळाल्या नसल्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्या, त्यामुळे बाजार समितीच्या नियमित कर्मचा-यांचे व सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांचे दरमहा वेतन व सेवानिवृत्तीनंरचे लाभ तात्काळ देणेबाबत या कार्यालयाने बाजार समितीला वेळोवेळी कळविले. परंतू, अद्यापही बाजार समितीच्या कर्मचा-यांचे वेतन व देणी देण्यास कसूर करीत असून, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७(१)(इ) चे उल्लंघन करीत असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर या बाजार समितीच्या संचालक मंडळाला याद्वारे विचारणा करण्यात येते की, आपण महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतूदी, शासनाचे व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रकीय निर्देश तथा सूचना, तसेच बाजार समितीच्या पोट-नियमानुसार सोपविलेली जबाबदारी व कर्तव्य पार पाडण्यास हेतुपुरस्सर व जाणीवपूर्वक कसून करीत असूर, आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५(१) मधील तरतूदीनुसार सदरहू बाजार समितीचे अधिक्रमण करून, त्या जागी प्रशासकाची नेमणूक का करण्यात येवू नये ? याचे लेखी स्पष्टीकरण ही कारणे दाखवा नोटीस मिळाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. तसेच या प्रकरणी आपणास प्रत्यक्ष म्हणणे मांडावयाचे असल्यास दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ रोजी दुपारी १.०० वाजता आपण स्वतः किंवा आपण प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचे कार्यालयात उपस्थित राहावे.

सदरहू कारणे दाखवा नोटीस महाराष्ट्र शासन, सहकार व कृषि विभागाचे अधिसूचना क्रमांक एपीएम-२०८१-३६३४०-४४०-११-स, दिनांक ५ सप्टेंबर, १९८१ अन्वये निम्न स्वाक्षरीकारास प्राप्त अधिकारानूसार आज दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारीत केली असे.

**मनोज देशकर,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, भंडारा.

भंडारा :
दिनांक १३ सप्टेंबर २०१९.

ना.—एक-अ-२ (१६८०).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.